# प्रेस नोट दि.१२/०७/२०२१

## निगडी पोलीस ठाणे कडील तपास पथकाची कामगिरी

## बनावट नोटा तयार करणा-या आंतरराज्यीय रॅकेट निगडी पोलीसांकडुन उघड

**३२,६७,०००/- रु.बनावट नोटा ,लॅपटॉप,प्रिंटर व ज्युपीटर गाडी असे एकुण ३३,३७,०००/- रु चा मुद्देमाल जप्त**

**पंढरपुर,सातारा,मुंबई,गुजरात राज्य याठिकाणारुन ६ आरोपींना अटक**

---

निगडी पोलीस स्टेशन हद्दीतील ओटास्कीम भागात चार ते पाच दिवसात एक व्यक्ती नकली नोटा घेवून येणार आहे,अशी खबर होती परंतु नेमका कधी येणार आहे याची खात्री नव्हती.त्यामुळे निगडी पोलीस तपास पथक त्याच्या पाळतीवर असताना तो अचानक दि.२३/०६/२०२१ रोजी गि-हाईक शोधण्यासाठी येणार असल्याबाबत तपास पथकातील पोलीस हवालदार किशोर पढेर व पोलीस नाईक रमेश मावसकर यांना गुप्त बातमी मिळाल्याने सदरची माहीती श्री गणेश जवादवाड वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांना कळविली असता त्यांनी पोलीस उपनिरीक्षक रावसाहेब बांबळे व तपास पथकाचे अंमलदार पोहवा किशोर पढेर,विक्रम जगदाळे, आनंद साळवी,पो.शि.तुषार गेंगजे यांना बोलावून घेवून योग्यते मार्गदर्शन व सुचना देवून कारवाई करण्यास सांगून पोलीस उपनिरीक्षक रावसाहेब बांबळे यांनी बातमीची खात्री करून त्यात वर्क आऊट करून सदर गुप्त बातमीच्या आधारे स्मशान भुमी समोर ओटास्कीम निगडी भागात सापळा लावला असता दि.२३/०६/२०२१ रोजी १८.०० वा. दरम्यान बातमीदाराने सांगितलेल्या वर्णना प्रमाणे एक व्यक्ती ज्युपीटर मोटार सायकलवर स्मशानभुमी समोर संशयीतरित्या फिरत असताना आढळुन आला त्यास सापळा लावुन पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी त्यास ताब्यात घेवून त्याचे नाव गाव विचारता त्याने आपले नाव गोरख दत्तात्रय पवार वय ३० वर्षे रा.मु.पो.माळवणी ता.पंढरपुर जि.सोलापुर असे सांगितले त्याची व गाडीचे झडती घेतली असता सदर इसमाचे पॅन्टचे खिशात २०००/- रू दराच्या ५० नोटा, त्याचे ताब्यातील ज्युपीटर गाडी नं. एम.एच१३डी. एल ०२८५ च्या डिग्गीमध्ये आकाशी रंगाच्या कापडी पिशवीत २००० रुपये नोटांचे चार बंडल मिळून आले त्यामध्ये एकाच नंबरच्या अनेक नोटा असल्याने सदर सर्व नोटा या बनावट असल्याची खात्री झाल्याने त्या मोजून पाहीले असता त्यात २९३ बनावट चलनी नोटा असे ५,८६,०००/-रू मिळुन आले. त्याबाबत सविस्तर दोन पंचासमक्ष पंचनामा करून सदरच्या नोटा जप्त करण्यात आले. दि.२४/०६/२०२१ रोजी सकाळी स्टेट बँक मार्फत सदर नोटाचे परीक्षण केले असता स्टेट बँकेचे मॅनेजर यांनी सदर २०००/-रू च्या सर्व नोटा हया नकली असल्याचे लेखी कळविल्याने सदर घटने बाबत सरकार तर्फे निगडी पोलासांनी वरील **आरोपी विरूध्द निगडी पोलीस ठाणे गु.र.न. ३०२/२०२१ भा.द.वि.कलम ४८९(ब),४८९(क) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून सदर गुन्हयाचा पुढील तपास रावासाहेब बांबळे हे करीत आहेत.**

सदर गुन्हयाचे गाभीर्य लक्षात घेवून बनावट नोटा कोठून आणल्या आहेत.यामध्ये इतरही कोणी आरोपी सामील आहेत अगर कसे? तसेच नकली नोटा कोठे छापल्या आहेत. यामध्ये नकली नोटा तयार करणारे मोठे रॅकेट आहे काय? या अनुषंगाने मा.पोलीस आयुक्त सो यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस कस्टडी मधील आरोपी गोरख पवार याचेकडे कौशल्यपुर्ण तपास करून त्याचेकडे मिळून आलेल्या नोटा हया त्याचा मित्र नामे विठ्ठल गजानन शेवाळे (पुर्णनाव पत्ता माहीत नाही) यांनी दिल्याचे तपासात निष्पन्न झाल्याने **रावसाहेब बांबळे पोलीस उप निरीक्षक यांनी तांत्रिक विश्लेषणाच्या** आधारे तपास केला असता आरोपी विठ्ठल गजानन शेवाळे हा मु.पो.ढेबेवाडी ता.पाटाण जि.सातारा येथे राहत असल्याचे माहीती काढून पोलीस कस्टडी मधील आरोपी गोरख दत्तात्रय पवार यास सोबत घेवून निगडी तपास पथक टिम ता.पाठण जि.सातारा येथे पोहचले असता पाहीजे आरोपी **शेवाळे यांचा फोन अधुन मधुन बंद येत होता. त्यातच रात्रीची वेळ असल्याने गावात लाईट बंद असल्याने तसेच पावसामुळे निगडी तपास पथकाच्या टिमला भरपूर अडचणी आल्या परंतु निगडी पोलीसांनी चिकाटीने वेगवेगळ्या युक्ती वापरून पाहाटे साखर झोपेत असताना आरोपी नामे विठ्ठल गजानन शेवाळे यास ताब्यात घेतले.**

दोन्ही आरोपींना विश्वासात घेवून तपास करीत असताना **पोलीस कस्टडीतील आरोपी नामे गोरख दत्तात्रय पवार याचे रहाते घरी आणखीन बनावट नोटा असल्याची माहीती प्राप्त झाली परंतु तो कबुल करत नसल्याने सातारा येथून तपास पथक मु.पो.माळवणी ता.पंढपूर जि.सोलापूर येथे आरोपीची राहते घरी जावून दोन पंचासमक्ष घरझडती घेतली**

Scanned with CamScanner

आरोपीने लपुन ठेवलेल्या २०००/- रू च्या २५५ नकली नोटा व ५००/- रू दराच्या २६ नकली नोटा असे एकूण ५,२३,०००/- रूच्या बनावट नोटा जप्त करण्यात आले आहे.

गुन्हयातील आरोपी नं.२ आरोपी विठ्ठल गजानन शेवाळे वय – ३८ वर्षे रा.डी. आर.पाटील बिल्डींग ढेबेवाडी तालुका पाटण जि.सातारा यास गुन्हयात अटक करुन तपास करता तो बनावट नोटांबाबत माहिती सांगत नसल्याने तपास पथक आरोपीसह त्याच्या राहते घरी जावुन त्याच्या घराची झडती घेतली असता त्याच्या राहते घरी २०००/- रू च्या १८० नकली नोटा व ५००/- रू दराच्या २१ नकली नोटा असे एकुण ३,७०,५००/- रू च्या बनावट नोटा मिळून आल्याने जप्त करण्यात आले आहे.सदर नोटा कोठून व कोणा कडून आणले आहेत. याबाबत तपास करता सदरचे नोटा आरोपी नं ३ जितेंद्र रंकनिधी पाणीग्रही वय ३६ वर्षे रा.चंद्रेश्वर बिल्डींग डी विंग-फलट नं.२०२ संकेश्वरनगर नालासोपारा पुर्व वसई पालघर याने दिल्याचे तपासात निष्पन्न झाल्याने त्याचा राहते पत्यावर जावून शोध घेतला असता त्यास दहशतवादी विरोधी पथक (ATS) चारकोप युनिट मुंबई यांनी १३/०६/२०२१ रोजी बनावट नोटाच्या गुन्हयात अटक केल्याचे समजल्याने त्यास मा.न्यायालयातून वर्ग करुन दि.०१/०७/२०२१ रोजी अटक करण्यात आले आहे.

<u>गुजरात तपास :-</u> आरोपी नामे जितेंद्र पाणीग्रही याच्याकडे बनावट नोटांबाबत तपास करता सदरच्या बनावट नोटा त्याने त्याचा साथीदार गुन्हयातील पाहिजे आरोपी नामे राजु (पुर्ण नाव पत्ता माहीत नाही) रा.म्हैसाण राज्य गुजरात याच्याकडुन आणल्याचे तपासात निष्पन्न झाले परंतु नाव पत्ता अपुर्ण असल्याने आरोपी नक्की गुजरात मध्ये कोठे राहतो याबाबत काही माहिती मिळुन येत नव्हती,त्यावेळी पोलीस उपनिरीक्षक बांबळे यांनी तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे आरोपी हा म्हैसाणा,अहमदाबाद,पालनपुर राज्य गुजरात भागात वास्तव्यास असल्याची माहिती प्राप्त होताच पोलीस उपनिरीक्षक रावसाहेब ,पोलीस हवालदार किशोर पढेर,विक्रम जगदाळे,पोलीस नाईक भुपेंद्र चौधरी,अमोल साळुंखे अशी सहा जणांची टिम म्हैसाना,अहमदाबाद,पालनपुर गुजरात राज्यात जावुन म्हैसाना गुजरात या ठिकाणी आरोपीस पकडण्यासाठी बनावट गिऱ्हाईक तयार करुन आरोपीस पकडण्या करीता समोरासमोर दोन लॉज बुक करुन दिनांक -०८/७/२०२१ रोजी सकाळी ०६/०० वा जे पासुन रात्री २४/०० वाजेपर्यतट्रप लावुन आरोपीस बनावट गिऱ्हाईकाव्दारे फोन करुन बोलविले असता,२ घंटे आता हुं १ घंटे मे आता, आधा घंटे मे आता हुं असे सांगुन तो येण्यास टाळाटाळ करीत असल्याने लक्षात येताच त्याचे मोबाईलचे लोकेशन चेक केले असता ते लोकेशने बनास डेअरी,लालावाडा पालनपुर रोड जि.बनासकाठा गुजरात या ठिकाणी येत असल्याचे लक्षात येताच तपासपथकाची टिम म्हैसाणा येथुन निघुन पालनपुर येथे जावुन तेथील स्थानिक पोलीसांची मदत घेवुन आरोपीचा शोध घेतला असता तो बनास डेअरी,लालावाडा पालनपुर रोड जि.बनासकाठा गुजरात येथे जावुन शोध घेतला असता आरोपी दिनांक ०९/०७/२०२१ रोजी रात्री ०८/०० वाजत मिळुन आला त्यास ताब्यात घेवुन चौकशी केली असता त्याचे नाव <u>राजु ऊर्फ रंणजितसिंह फतुभा परमार वय ३८ वर्षे धंदा - मजुरी रा.मु.पो.रानपुर काकरीया चौरा ता.रानपुर जि.बोटाद गुजरात</u> असे असल्याचे सांगितले त्याची दोन पंचासमक्ष झडती घेतला असता त्याच्याकडे असलेल्या प्लास्टीकच्या पिशवीत १५,९३,०००/- रुपये किमतीच्या २०००/- रुपयाच्या ६०० व ५००/- रुपयाच्या ७८६ बनावट नोटा मिळुन आल्या त्या पंचनामा करुन जप्त करण्यात आल्या आहेत.

आरोपी नामे राजु ऊर्फ रंणजितसिंह फतुभा परमार याच्याकडे बनावट नोटांबाबत तपास केला असता सदर बनावट नोटा याबाबत तपास करता.त्याने सदरच्या नोटा हया आरोपी नामे जितेंद्रकुमार नटवरभाई पटेल वय २६ वर्षे रा.घर नं.०१ गणेशपुरा पालनपुर ता.पालनपुर जि.बनासकाठा गुजरात व किरणकुमार कांतीलाल पटेल वय ३८ वर्षे रा. जुना लक्ष्मीपुरा घर नं.११ पालनुपर ता.पालनपुर जि.बनासकाठा गुजरात यांच्याकडुन आणल्याचे सांगितल्याने सदर दोन आरोपींचा त्यांच्या पत्त्यावर जावुन शोध घेतला असता आरोपी नामे जितेंद्रकुमार नटवरभाई पटेल हा घरी मिळुन आल्याने त्यास ताब्यात घेवुन त्याचा रात्री आरोपी नामे किरणकुमार पटेल याच्या घरी जावुन त्यास ताब्यात घेवुन चौकशी केली असता,त्यांचा गुन्हयात सहभाग असल्याचे निष्पन्न झाल्याने वर आरोपी नामे १) <u>राजु ऊर्फ रंणजितसिंह फतुभा परमार २)</u> जितेंद्रकुमार नटवरभाई पटेल ३) किरणकुमार कांतीलाल पटेल यांना अटक करुन त्यांना मा.चिफ ज्युडीशियल न्यायालय पालनपुर यांच्या न्यायालयात हजर करुन ट्रान्झीट रिमांड घेवुन आरोपींनकडे बनावट नोटा बनवण्यासाठी वापरलेले साहित्यबाबत तपास करुन आरोपी नामे जितेंद्रकुमार नटवरभाई पटेल व किरणकुमार कांतीलाल पटेल यांच्याकडुन एक लिनोआ कंपनीचा लॅपटॉप व इप्सॉन कंपनीचा कलर प्रिंटर असे जप्त करण्यात आलो आहे.

सदर गुन्हयाचा दिनांक २४/०६/२०२१ रोजी दाखल झालेपासुन दिनांक -११/०७/२०२१ रोजी पर्यत सदर गुन्हयाचा सलग १८ दिवसरात्र सातत्याने कौशल्यपुर्ण तपास करुन <u>पुणे,सातारा,मुबई व पालनपुर राज्य गुजरात येथे तीन असे एकुण ६ आरोपीनां अटक करुन</u> त्यांच्याकडुन तपासा दरम्यान २०००/- रुपये दराच्या १४०२ व ५००/- रुपये दराच्या

Scanned with CamScanner

९२९/- बनावट नोटा अशा एकुण ३२,६७,०००/- रुपयाच्या बनावट नोटा लिनोआ कंपनीचा लॅपटॉप,इप्सॉन कंपनीचा प्रिंटर व एक ज्युपिटर गाडी असा एकुण ३३,३७,०००/- रुपये किमतीचा मुददे माल जप्त करण्यात आला आहे.

सदरची कामगिरी मा.श्री.कृष्ण प्रकाश पोलीस आयुक्त सो, मा.श्री.रामनाथ पोकळे अप्पर पोलीस आयुक्त सो, मा.श्री.मंचक इप्पर पोलीस उपआयुक्त सो परि - १.मा.डॉ.सागर कवडे सहायक पोलीस आयुक्त सो पिंपरी विभाग,यांचे मार्गदर्शनाखाली श्री.गणेश जवादवाड वरिष्ठ पोलीस निरीक्षक सो.श्री.कृष्णदेव खराडे पोलीस निरीक्षक सो.(गुन्हे). श्री.डॉ.संजय तुंगार पोलीस निरीक्षक सायबर शाखा,श्री.लक्ष्मण सोनवणे सहा.पोलीस निरीक्षक,श्री.आर.बी.बांबळे पोलीस उप निरीक्षक व तपास पथकातील पोलीस हवालदार किशोर पढेर,विक्रम जगदाळे, आनंद साळवी, सतिश ढोले, राजु जाधव, पोलीस नाईक विनोद व्होनमाने,राहुल मिसाळ, विजय बोडके, रमेश मावसकर, भुपेंद्र चौधरी,तुषार गेंगजे,विलास केकाण पोलीस शिपाई दिपक जाधवर, अमोल सांळुखे, विकास आवटे,मपोना/मनीषा पाटील पिंपरी चिंचवड आयुक्तालय यांनी केली आहे.

(मंचक इप्पर)
पोलीस उप-आयुक्त
परि-१ पिंपरी चिंचवड आयुक्तालय

Scanned with CamScanner